RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५९

दि. २३ जून २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## विनोदभाऊ खटके यांच्या वाढदिवसानिमित्त चाकूर येथे मोफत नेत्ररोग शिबिर आणि भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्हाध्यक्ष शरद किणीकर आणि तालुकाध्यक्ष अजय वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली चाकुर तालुक्यातील सर्व जनतेसाठी मोफत नेत्ररोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन दि. २३.०६.२०२६ वार मंगळवार रोजी करण्यात आले आहे या शिबिराचा लाभ घेण्याच्या आवाहन जिल्हाध्यक्ष शरद किणीकर तालुका अध्यक्ष अजय वाघमारे यांनी केले आहे तसेच रक्तदान शिबिराचे भव्य नियोजन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे या रक्तदान शिबिरामध्ये चाकूर तालुक्यातील युवकांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदान करावे असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. या दोन्ही शिबिरांच्या यशस्वीतेसाठी चाकूर तालुक्यातील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे मार्गदर्शक माधव कांबळे सर, जिल्हा उपाध्यक्ष कुलदीप कांबळे, ग्रुप समाधान गायकवाड सचिव गजानन कांबळे, शहराध्यक्ष विक्रम कांबळे , केतन कांबळे , शादुल शेख, इस्माईल पठाण व इतर सर्व पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.



# शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला बचतगट सक्षमीकरणासाठी प्रयत्न करा-जिल्हाधिकारी

### – 'नवतेजस्विनी' प्रकल्प जिल्हा सल्लागार समितीची बैठक – कृषि विभाग, मनरेगाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवावेत

**लातूर/प्रतिनिधी :**राज्य शासन महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवीत आहे. यासोबतच विविध शासकीय विभागांच्या योजनांमध्ये महिला बचतगटांनाही प्रोत्साहन देण्यात येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) या विभागांशी समन्वय ठेवून महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, जिल्हा




अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रमोद पाटील, कौशल्य विकास सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा ग्रामउद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मनरेगामधून रोपवाटिका निर्मिती, कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोकरा प्रकल्पात समाविष्ट गावांमध्ये अवजारे बँक यासाठी महिला बचतगटांना प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून संबंधित विभागाशी समन्वय साधून या योजनांचा लाभ महिला बचतगटांना द्यावा. यासोबतच कुक्कुटपालन, शेळीपालन आदी व्यवसाय उभारणीसाठीही बँकेचे सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले.

प्रारंभी महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी महामंडळाच्या जिल्ह्यातील कामकाजाची माहिती दिली.

## लातुरात महेश नवमीनिमित्त आज भव्य शोभायात्रा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी दुपारी चार वाजता छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचा शुभारंभ सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, व्यापारी धर्मशाळेची अध्यक्ष रमेश राठी, उद्योजक अशोक भुतडा, धनराज भुतडा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गौरीशंकर मंदिरापासून निघालेली ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशालेच्या प्रांगणात विसर्जित होणार आहे. शोभायात्रेचे विशेष आकर्षण माहेश्वरी ढोलताशा पथक असणार आहे. या शोभायात्रेचे संयोजक ईश्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत.

या शोभायात्रेत माहेश्वरी समाजातील बंधू – भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेश मंत्री, संगठन मंत्री फुलचंद काबरा, जगदीश भुतडा यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. शोभायात्रा गोदावरी कन्या प्रशालेत पोहोचल्यानंतर सायंकाळी सहा ते दहा या वेळेत तोष्णीवाल परिवाराच्या वतीने सामूहिक स्नेह भोजन होणार आहे. या भोजनाचाही समाजबांधवांनी लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

### कतारच्या गॅस टर्मिनलमध्ये भीषण स्फोट; ५४ जण जखमी, १८ बेपत्ता

कतार: कतारमधील रास लफान औद्योगिक क्षेत्रात रविवारी रात्री मोठा स्फोट झाल्याने खळबळ उडाली आहे. या स्फोटानंतर लागलेल्या आगीत किमान ५४ जण जखमी झाले असून १८ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. बचाव पथके घटनास्थळी युद्धपातळीवर शोध आणि मदतकार्य करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हा स्फोट कतारच्या प्रमुख नैसर्गिक वायू निर्यात टर्मिनल परिसरात झाला. अलीकडील प्रादेशिक तणाव आणि युद्धसदृश परिस्थितीमुळे काही काळ बंद असलेले कामकाज पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच ही दुर्घटना घडली. स्फोटानंतर परिसरात मोठी आग लागली. सुरुवातीला अधिकाऱ्यांनी काही जण जखमी झाल्याची माहिती दिली होती. मात्र काही तासांनंतर जखमींची संख्या ५४ वर पोहोचल्याचे स्पष्ट झाले.

## वार्तांकन करत असताना पत्रकारांना मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करा

### पत्रकारांचे पोलीस अधीक्षकांसह मुख्यमंत्र्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील अस्थी रोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांच्या हॉस्पिटलमध्ये एका रुग्णाचा संशयास्पद मृत्यू झाल्यांनतर त्या ठिकाणी वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलीस अधिकाऱ्यांकडून मारहाण, शिवीगाळ करण्यात आली. त्यावेळी सदर पोलीस अधिकाऱ्यांनी कायद्याची बाजू समजून न घेता अरेरावी केली. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी लातूर जिल्ह्यातील पत्रकारांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासह मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईआदींना पाठवण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हंटले आहे, शुक्रवार, दि. १९ जून रोजी येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये भरती असलेल्या बालाजी चव्हाण या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यावेळी त्याच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सदर व्यक्ति मयत झाल्याचा आरोप केला होता. त्याचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या काही पत्रकारांना पोलीस उपाधीक्षक समीर साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे यांनी धक्काबुकी, मारहाण करत शिवीगाळ केली. लातूर जिल्ह्यात यापूर्वीही पत्रकारांना पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून वार्तांकन करताना आडविणे, अर्वाच्य भाषेत बोलणे, मारहाण करणे आदी प्रकार घडले आहेत. सदर बाब लोकशाहीत अशोभनीय आहे. त्यामुळे संबंधितांची खातेनिहाय चौकशी करत सात दिवसात त्यांचे निलंबन करण्याची मागणी पत्रकारांकडून करणात आली आहे. निवेदनाची दाखल नाही घेतल्यास लोकशाही मार्गाने पत्रकारांनी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष



अशोक देडे, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे लातूर जिल्हाध्यक्ष नरसिंग घोणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, डिजिटल विंग जिल्हाध्यक्ष मनीष हजारे, नेताजी जाधव, रामप्रसाद काबरा, आनंद दणके, अतिश कांबळे, हरून मोमीन, अंबादास करकरे, मोहसीन खान, शिवाजी कांबळे, रवी बिराजदार, यशवंत पवार, सौदागर अजित, शरद पवार, चंद्रकांत सूर्यवंशी, सोनवणे संतोष, वाल्मीक केंद्रे, नितीन बनसोडे, संदीप गवळी, सुनील कांबळे, शिंदे लहू, रोहिदास कलवले, शेख, विक्रांत शंके, समीर शेख, शेख इस्माईल, मारुती पवार, विष्णू अष्टेकर, वामन पाठक, शिवाजी मिसाळ, शरद राठोड, परवेज सय्यद आदींच्या सह्या आहेत.

## महायुतीचे नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** धाराशिव – लातूर – बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेवर प्रचंड बहुमताने विजयी झालेले भाजपा महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचे निकाल जाहीर होताच भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव – लातूर – बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीच्या वतीने भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून ही निवडणूक एकतर्फीच होणार असे चित्र स्पष्ट होते. लातूर जिल्ह्यासह बीड धाराशिव या तिन्ही जिल्ह्यातून बसवराज पाटील यांना महायुतीच्या नेत्यासह मतदारांनी मोठे समर्थन दिले होते. या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी सकाळी धाराशिव येथे झाली.

धाराशिव – लातूर – बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्याचे घोषित होतात भाजपा सह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून पेढे भरून नवनिर्वाचित विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांचे अभिनंदन केले.

यावेळी माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह लातूर



ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, अभिषेक आकनगिरे, बन्सी भिसे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, वैभव सापसोड, विजय काळे, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

ROYAL EDUCATION SOCIETY'S

शारदा इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग

उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूस, अंबाजोगाई रोड, लातूर

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व M.S.B.N.P.E. मुंबई संलग्नित

G.N.M

पात्रता : १२ वी पास, कालावधी : ३ वर्षे

SC/ST/NT/OBC व OPEN (EWS) प्रवर्गासाठी शासन नियमानुसार स्कॉलरशीप लागू

प्रवेश सुरू

मुलांसाठी विशेष राखीव प्रवेश

खुल्या प्रवर्गासाठी सवलतीत फी !

नुकत्याच ANM उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी GNM प्रवेशाची सुवर्णसंधी

श्री. संदीपान गुंजरगे 9175761413/9577080777

## संपादकीय...

### अल निनोच्या प्रभावामुळे जलसाठ्यांवर गंभीर संकट निर्माण झाले आहे.

अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून रखडल्याने कोकणातील भात शेती आणि जलसाठ्यांवर गंभीर संकट निर्माण झाले आहे. पाऊस उशिरा येत असल्याने शेतकरी, उद्योग आणि उपजीविकेवर दुहेरी आर्थिक ताण वाढला आहे. जवळजवळ गेल्या ११ वर्षांच्या सुरक्षित मान्सूनच्या प्रवासानंतर आता अल निनोच्या प्रभावामुळे टंचाईचे आणि दुष्काळाचे ढग घोंगावू लागले आहेत. कोकण भाग हा भाताचे सर्वाधिक उत्पादन देणारा प्रदेश आहे. या भागामध्ये सिंधुदुर्गपासून पालघरपर्यंत पाचही जिल्ह्यांत भातशेती हेच प्रमुख पीक आहे. कोकणची 'वाडा कोलम' ही भाताची सर्वाधिक मागणी असलेली जात आहे; मात्र जूनचा तिसरा आठवडा संपला, तरी पाऊस येण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे भात पेरण्या तर पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागांमध्ये सर्वाधिक शेती होते. यावेळचा हंगाम मात्र चिंतेचे ढग निर्माण करत आहे. इतिहासाचा आढावा घेतला, तर १९७२ पासून २०२६ हा ५४ वर्षांच्या कालखंडात ११ वेळा अल निनोचा प्रभाव दिसून आला. यातील ९ वेळा दुष्काळाचा मोठा सामना करावा लागला. आताही मान्सूनने ओढ दिल्यामुळे कोकणात एका बाजूला तीव्र पाणीटंचाई आणि दुसऱ्या बाजूला भात शेतीवरील संकट अशा दुहेरी प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. भाताच्या पेरण्या न झाल्यामुळे ८० ते ९० दिवसांचे एक पीक धोक्यात येण्याची शक्यता आहे. सध्या हवामानातील वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढल्याने जलसाठे, विहिरी आणि धरणातील पाणी पातळी मोठ्या प्रमाणावर कमी होऊ लागली आहे. त्यामुळे एका बाजूला पिण्याच्या पाण्याची टंचाई, तर दुसऱ्या बाजूला शेतीवरील संकट असे दुहेरी संकट कोकण भागात घोंगावताना दिसत आहे. उष्णतेच्या लाटांचा मारा सुरू असल्याने कोकणात आरोग्यविषयी समस्याही वाढल्या आहेत. आतापर्यंत कोकणात १०० ते १२० मि.मी. पाऊस झाला आहे. तो मागच्या वर्षी ७५० मि.मी. होता. आता २५ जूनला पाऊस परतेल, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. अरबी समुद्रातील मान्सूनचे वारे पुढे ओढणारी सोमाली जेट ही वायू प्रणाली कमकुवत झाल्याने मान्सून रखडला आहे. तो पुन्हा सक्रिय होण्यास आता जून अखेर येणार आहे; मात्र यामध्ये पेरणीचा मुख्य हंगाम निघून गेल्याने कोकणच्या भात शेतीवर संकट गडद झाले आहे. शासनाने पेरणीची घाई करू नये, असे सांगितले असले, तरी मान्सूनचा पहिला महिना कोरडा गेल्याने पुढील कालावधीत भाताचे पीक होणे केवळ अशक्य झाले आहे. कोकण प्रदेशात दरवर्षी साडेतीन हजार मि.मी. पेक्षा जास्त पाऊस पडत असल्याने या प्रदेशाचे प्रादेशिक पीक हे भात आहे. कारण, भात पिकाला लागणारा आवश्यक पाऊस पावसाळ्याच्या चार महिन्यांच्या कालावधीत पडतो आणि येथील माणसांचे बहुतांश अर्थकारण यावर अवलंबून आहे. एका बाजूला दुबार पेरण्यांचे संकट आणि दुसऱ्या बाजूला ९० दिवसांपर्यंतची पिके यावेळी नेमकी येतील की नाही, याबाबतची धाकधूक शेतकऱ्यांच्या मनात पाहायला मिळत आहे. कोकणात भात आणि भातावर आधारित प्रक्रिया उद्योग अधिक प्रमाणात आहे. यामध्ये पोह्यापासून पापडापर्यंत अनेक उत्पादने तांदळापासून तयार केली जातात. हे पीकच संकटात आल्यामुळे त्यावर आधारित उद्योगांवरही संकट आले. भातापासून तांदूळ तयार करणाऱ्या मिलही आहेत. हे सर्व उद्योग सध्या अडचणीत आहेत. पाऊस कमी झाल्याने पाण्याचे प्रमाणही कमी आहे. याचा परिणाम कोकणातील मस्त्य उद्योगावरही होणार आहे. भातशेतीवर निर्वाह करणारे कोणात २५ लाखांपेक्षा जास्त शेतकरी आहेत. १५ ते १८ लाख मच्छीमार व्यवसायात आहेत. या सर्वांचेच अर्थकारण बिघडवणारा असे हे संकट असल्याने त्याचे गांभीर्य अधिक आहे. शासकीय पातळीवरून या सर्व परिस्थितीवर मात करण्यासठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले गेले आहे; परंतु तशा ठोस उपाययोजना काही सुरू नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याला या संकटाची चिंता अधिक वाटत आहे. एका बाजूला शासकीय तिजोरीत पैसा कमी असल्याची ओरड तर दुसऱ्या बाजूला कर्जमाफीची घोषणाही अनेक जाचक अटींमध्ये अडकल्याचा होणारा प्रचार आणि पीक कर्ज देण्यासाठी बँकांनी घेतलेला आखडता हात अशी अनेक संकटे बळीराजासमोर उभी आहेत. कमी पावसाचे संकट हे नैसर्गिक असले, तरी त्यावर उपाययोजना करणे सरकारच्या हाती आहे. म्हणूनच या गंभीर संकटावर अधिक सक्षमपणे उपाय होणे गरजेचे आहे.

# विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा

दि. २३ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' म्हणून जगभरात पाळला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून समाजातील अत्यंत संवेदनशील, अनेकदा दुर्लक्षित आणि शांतपणे वेदना सहन करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जीवनातील वास्तवाकडे पाहण्याची एक गंभीर संधी आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकास, औद्योगिकीकरण किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीने होत नाही, तर त्या समाजात दुर्बल घटकांना मिळणारे सन्मान, सुरक्षा आणि समान संधी यावरून खऱ्या अर्थाने ठरते. या निकषावर पाहिले असता विधवा स्त्रियांची स्थिती हा समाजाच्या अंतर्मनाचा आरसा ठरतो. हा आरसा आपल्याला केवळ प्रगती दाखवत नाही, तर अनेक ठिकाणी असलेल्या असमानता, परंपरागत मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेचेही स्पष्ट प्रतिबिंब दाखवतो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे.

विधवा स्त्रीचे जीवन हे अचानक कोसळलेल्या भावनिक व सामाजिक भूकंपासारखे असते. विवाहानंतर मिळालेला सहजीवनाचा आधार, भावनिक सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक ओळख पतीच्या निधनानंतर एका क्षणात बदलून जाते. त्या क्षणी तिच्या जीवनात केवळ दुःख नसते, तर अनिश्चितता, भीती, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांचा मोठा डोंगर उभा राहतो. मुलांचे संगोपन, घराचा आर्थिक भार, समाजाचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न हे सर्व एकाच वेळी तिच्यासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगण्याचा प्रयत्न करतात. त्या संघर्षाची किंमत मात्र समाज अनेकदा ओळखत नाही. हा अदृश्य संघर्ष या प्रश्नाची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीचे स्थान अनेक बदलांमधून गेले आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीला शिक्षण, संपत्ती आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग होता. परंतु कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे तिच्यावर बंधने वाढत गेली. विशेषतः मध्ययुगीन काळात सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि कठोर सामाजिक रूढी यांनी स्त्रीचे जीवन अधिक कठीण केले. आधुनिक भारतात कायद्याच्या माध्यमातून या अमानुष प्रथांवर बंदी घालण्यात आली असली तरी समाजातील मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. आजही काही भागांमध्ये विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढींच्या चौकटीत अडकलेला दिसतो. त्यामुळे कायदेशीर प्रगती आणि सामाजिक मानसिकता यामध्ये एक मोठी दरी आजही अस्तित्वात आहे.

विधवा स्त्रियांच्या जीवनातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे आर्थिक असुरक्षितता. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधार अचानक नाहीसा होतो किंवा अत्यंत कमी होतो. ज्या स्त्रिया गृहिणी असतात, त्यांच्याकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे त्या पूर्णपणे कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. हे अवलंबित्व अनेकदा त्यांच्या स्वाभिमानावर परिणाम करते. काही वेळा त्यांचा आर्थिक निर्णयांवर अधिकारही कमी होतो. वारसा हक्क, मालमत्ता, बँक व्यवहार आणि सरकारी लाभ याबाबत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कायद्याने अधिकार दिले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अधिकारांचा उपयोग अनेकदा होत नाही. परिणामी आर्थिक स्वावलंबनाचा अभाव त्यांना दीर्घकाळ असुरक्षित ठेवतो.

सामाजिक दृष्टिकोन हा या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. समाजात अजूनही काही ठिकाणी विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा नसून उपेक्षेचा आहे. तिला शुभकार्यांपासून दूर ठेवणे, तिच्या वेशभूषेवर निर्बंध घालणे, तिच्या उपस्थितीला अशुभ मानणे किंवा तिला दुय्यम स्थान देणे अशा अनेक प्रथा काही भागांमध्ये आजही दिसतात. या प्रथा केवळ अंधश्रद्धा नसून त्या मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणाऱ्या आहेत. स्त्रीचे मूल्य तिच्या वैवाहिक स्थितीवर ठरवणे ही मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करते. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच असतो जिथे प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अस्तित्वावर सन्मान दिला जातो.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत संवेदनशील असते. जीवनसाथीचा मृत्यू हा एक गंभीर भावनिक आघात असतो. त्या आघातातून सावरण्यासाठी वेळ, आधार आणि सहानुभूती आवश्यक असते. परंतु सामाजिक अपेक्षा इतक्या तीव्र असतात की स्त्रीला स्वतःच्या दुःखासाठीही वेळ मिळत नाही. तिला लगेचच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागते आणि समाजाच्या नियमांनुसार वागावे लागते. या प्रक्रियेत तिच्या भावनांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. एकटेपणा, नैराश्य, भविष्याची अनिश्चितता आणि भीती या भावना तिच्या मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करतात. मानसिक आरोग्याचे प्रश्न अनेकदा दिसत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.

शिक्षणाचा अभाव आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव हे देखील मोठे अडथळे आहेत. ग्रामीण भागात अनेक स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नसते. वारसा हक्क, पुनर्विवाहाचा अधिकार, सरकारी योजना, पेन्शन सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजना याबाबत अज्ञान असल्यामुळे त्या अनेक लाभांपासून वंचित राहतात. केवळ कायदे तयार करून उपयोग नाही; त्यांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कायदेशीर साक्षरता ही सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. माहितीशिवाय अधिकार निरर्थक ठरतात.

सरकारने विधवा स्त्रियांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. विधवा पेन्शन योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि पुनर्वसन कार्यक्रम यांचा उद्देश त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. मात्र या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचताना अनेक अडचणी येतात. कागदपत्रांची गुंतागुंत, प्रशासकीय विलंब, माहितीचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे अनेक पात्र स्त्रिया या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे.

पुनर्विवाहाचा मुद्दा समाजात अजूनही संवेदनशील मानला जातो. काही ठिकाणी पुनर्विवाह स्वीकारला जातो, तर काही ठिकाणी त्याला विरोध केला जातो. परंतु पुनर्विवाह हा स्त्रीच्या जीवनातील नवीन सुरुवातीचा मार्ग ठरू शकतो. तो तिच्या भावनिक स्थैर्यासाठी, सामाजिक स्वीकारासाठी आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो. स्त्रीचे जीवन केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसते, तर ते सतत पुढे जाणारे असते. त्यामुळे पुनर्विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक मानवी, सकारात्मक आणि स्वीकारशील असणे आवश्यक आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील परिस्थितीत मोठा फरक दिसून येतो. शहरी भागात शिक्षण, रोजगार आणि जागरूकता अधिक असल्यामुळे विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण तुलनेने चांगले झालेले दिसते. परंतु ग्रामीण भागात परंपरा, अंधश्रद्धा आणि सामाजिक दबाव अधिक असल्यामुळे परिस्थिती अधिक कठीण आहे. तरीही स्वयंसेवी संस्था, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. हा बदल मंद असला तरी दिशादर्शक आहे.

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा सर्वात मजबूत पाया आहे. शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास विधवा स्त्रिया आत्मनिर्भर होऊ शकतात. लघुउद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, सेवा क्षेत्र, लघु व्यापार आणि डिजिटल कौशल्ये यामधून त्या स्वतःचे जीवन उभे करू शकतात. आर्थिक स्वावलंबन केवळ उत्पन्न देत नाही, तर आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढवते.



समाजाच्या मानसिकतेत बदल घडवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. कायदे आणि योजना असूनही जोपर्यंत समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत खरे परिवर्तन शक्य नाही. विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दयेचा नसून समानतेचा असला पाहिजे. तिच्या अस्तित्वाला दुय्यम मानणे हे सामाजिक अन्यायाचे प्रतीक आहे. हा बदल केवळ नियमांनी नाही तर विचारांनी घडतो.

माध्यमांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी विधवा स्त्रियांच्या प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकणे आवश्यक आहे. त्यांच्या संघर्षकथा, यशोगाथा आणि प्रेरणादायी उदाहरणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही निर्णायक आहे. शालेय स्तरावर लिंगभाव समानता, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचे शिक्षण दिल्यास पुढील पिढी अधिक संवेदनशील बनेल.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही विधवा स्त्रियांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. अनेक देशांमध्ये त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरणे राबवली जात आहेत. लिंग समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक न्याय ही जागतिक उद्दिष्टे या प्रश्नाशी जोडलेली आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ स्थानिक नसून जागतिक आहे.

विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण हे केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. एक सक्षम स्त्री कुटुंबाला स्थैर्य देते, पुढील पिढी घडवते आणि समाजाला दिशा देते. त्यामुळे त्यांच्या विकासात गुंतवणूक करणे हे समाजाच्या भविष्यात गुंतवणुकीसारखे आहे.

शेवटी असे म्हणता येईल की आंतरराष्ट्रीय विधवा दिन हा केवळ स्मरणाचा नाही तर आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे. समाजाने स्वतःला विचारले पाहिजे की आपण विधवा स्त्रियांना कोणते स्थान देतो, त्यांना किती सन्मान देतो आणि त्यांच्या हक्कांसाठी किती सक्रिय आहोत. सहानुभूती पुरेशी नाही; सन्मान, समानता आणि सक्षमीकरण हीच खरी गरज आहे. विधवा स्त्री ही दयेची नव्हे तर अधिकारांची, आत्मनिर्भरतेची आणि सन्मानाची प्रतीक आहे ही जाणीव समाजात दृढ करणे हीच या दिनाची खरी प्रेरणा आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# संघभूमीच्या संघप्रमुखाला झेड प्लस सुरक्षा, मग दीक्षाभूमीच्या अध्यक्षाला का नाही?






महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक इतिहासात नागपूर हे एक विलक्षण शहर आहे. या शहराने दोन महत्त्वाच्या प्रवाहांना जन्म दिला. एकीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेली रेशीमबाग आणि दुसरीकडे जगभरातील आंबेडकरी अनुयायांसाठी प्रेरणास्थान असलेली दीक्षाभूमी. एका ठिकाणी हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची संघटनात्मक उभारणी झाली, तर दुसऱ्या ठिकाणी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवमुक्तीचा आणि समतेचा नवा इतिहास घडविला. आज प्रश्न असा आहे की, संघभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपुरातील संघप्रमुखांना केंद्र सरकारकडून झेड प्लस सुरक्षा मिळते, मग दरवर्षी लाखो लोकांच्या श्रद्धा, भावना आणि राष्ट्रीय वारशाचे प्रतीक असलेल्या दीक्षाभूमीच्या अध्यक्षांना तशाच पातळीवरील सुरक्षा व्यवस्थेचा विचार का केला जात नाही? हा प्रश्न व्यक्तींच्या तुलनेचा नाही. हा प्रश्न राज्याच्या दृष्टीकोनाचा, संवेदनशीलतेचा आणि समानतेच्या तत्त्वाचा आहे.

झेड प्लस सुरक्षा ही कोणत्याही व्यक्तीला तिच्या पदामुळे किंवा प्रतिष्ठेमुळे दिली जात नाही. ती संभाव्य धोक्याच्या मूल्यांकनावर आधारित असते. देशातील महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक व्यक्तींना गुप्तचर यंत्रणांच्या अहवालांच्या आधारे ही सुरक्षा दिली जाते. त्यामुळे संघप्रमुख मोहन भागवत यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात काहीच गैर नाही. ते देशातील प्रभावशाली संघटनेचे प्रमुख आहेत आणि त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी शासनाचीच आहे. परंतु याच निकषांवर दुसऱ्या बाजूचा प्रश्न उपस्थित होतो. दरवर्षी विजयादशमीला रेशीमबाग येथे लाखोंचे लक्ष वेधणारा कार्यक्रम होतो. त्याचप्रमाणे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर देशभरातून लाखो अनुयायी एकत्र येतात. अनेकदा या संख्येचा आकडा संघाच्या कार्यक्रमांपेक्षाही अधिक असतो. देश-विदेशातील बौद्ध अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते, संशोधक आणि मान्यवर येथे उपस्थित राहतात. अशा परिस्थितीत दीक्षाभूमीचे व्यवस्थापन, नेतृत्व आणि त्यासंबंधित सुरक्षा प्रश्नांचे महत्त्व कमी कसे ठरू शकते?

दीक्षाभूमी ही केवळ धार्मिक स्थळ नाही. ती भारतीय लोकशाहीतील सामाजिक न्यायाच्या चळवळीचे राष्ट्रीय स्मारक आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि लाखो अनुयायांना नवा मार्ग दिला. त्यामुळे दीक्षाभूमीचे स्थान केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही तर ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे आहे. आज देशातील अनेक धार्मिक आणि सामाजिक संस्थांच्या प्रमुखांना विविध प्रकारची सुरक्षा दिली जाते. काहींच्या बाबतीत ती त्यांच्या वैयक्तिक धोक्यामुळे असते, तर काहींच्या बाबतीत त्यांच्या संस्थात्मक महत्त्वामुळे. मग दीक्षाभूमीच्या नेतृत्वाबाबत समान निकष का लागू होत नाहीत, असा प्रश्न विचारणे गैर नाही. विशेष म्हणजे, आंबेडकरी समाजावर सामाजिक आणि वैचारिक पातळीवर सातत्याने हल्ले होत असल्याच्या तक्रारी अनेकदा पुढे येतात. बाबासाहेबांच्या विचारांवर, संविधानिक मूल्यांवर आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवरून देशात वारंवार संघर्ष निर्माण होत असतात. अशा पार्श्वभूमीवर दीक्षाभूमी हे संवेदनशील राष्ट्रीय प्रतीक आहे. त्यामुळे तिच्या नेतृत्वाच्या सुरक्षेकडे केवळ प्रशासकीय नव्हे, तर सामाजिक सलोख्याच्या दृष्टिकोनातूनही पाहिले जाणे आवश्यक आहे.

यामध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. भारतीय राज्यघटना सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार देते. शासनाच्या निर्णयांमध्येही समानतेची भावना दिसली पाहिजे. एखाद्या विचारप्रवाहाशी संबंधित संस्थेला सर्वोच्च स्तराची सुरक्षा मिळत असेल आणि दुसऱ्या ऐतिहासिक-सामाजिक प्रवाहाच्या प्रतिनिधींना तशी दखल मिळत नसेल, तर नैसर्गिकरित्या प्रश्न निर्माण होतात. शासनाने अशा प्रश्नांची उत्तरे केवळ राजकीय भाष्याने नव्हे, तर वस्तुनिष्ठ निकषांद्वारे दिली पाहिजेत. अर्थात, कोणालाही सुरक्षा देण्याचा निर्णय भावनांवर आधारित असू शकत नाही. तो सुरक्षा यंत्रणांच्या मूल्यांकनावरच आधारित असला पाहिजे. परंतु जर संघप्रमुखांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकार विशेष संवेदनशीलता दाखवत असेल, तर दीक्षाभूमीसारख्या राष्ट्रीय वारशाच्या केंद्राशी संबंधित नेतृत्वाच्या सुरक्षेचे स्वतंत्र मूल्यमापन करण्यास हरकत नसावी.

खरे तर हा प्रश्न केवळ झेड प्लस सुरक्षेपुरता मर्यादित नाही. तो भारतीय समाजातील प्रतीकांना मिळणाऱ्या अधिकृत मान्यतेचाही आहे. संघाचे मुख्यालय राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी असते. त्याच्या कार्यक्रमांना व्यापक माध्यम कव्हरेज मिळते. परंतु दीक्षाभूमीसारख्या सामाजिक क्रांतीच्या स्मारकाला त्याच प्रमाणात राष्ट्रीय महत्त्व दिले जाते का, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. आज भारत संविधानाच्या अमृतकाळाची चर्चा करीत आहे. संविधानाचा गौरव करताना त्याचे शिल्पकार आणि त्यांच्या ऐतिहासिक कार्याशी संबंधित स्थळांना तितक्याच सन्मानाने आणि संवेदनशीलतेने वागविण्याची जबाबदारी शासनावर आहे. अन्यथा संविधानाचा गौरव आणि प्रत्यक्षातील धोरणे यांच्यातील दरी वाढत जाईल. दीक्षाभूमी ही केवळ बौद्ध समाजाची नाही तर ती भारतीय लोकशाहीतील समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांची भूमी आहे.

संघभूमी आणि दीक्षाभूमी या दोन्ही नागपूरच्या ओळखीचा भाग आहेत. शासनाने एका प्रतीकाला सुरक्षा आणि सन्मान देताना दुसऱ्या प्रतीकाकडे दुर्लक्ष केल्याची भावना निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. म्हणूनच आज विचारला जाणारा प्रश्न हा कोणाविरुद्ध नाही. तो शासनाच्या समानतेच्या निकषांबाबत आहे. जर संघप्रमुखांना संभाव्य धोक्याच्या आधारे झेड प्लस सुरक्षा दिली जाऊ शकते, तर दीक्षाभूमीच्या नेतृत्वाच्या सुरक्षेचेही तितक्याच गांभीर्याने मूल्यांकन व्हायला हवे. सुरक्षा द्यायची की नाही, हा अंतिम निर्णय तज्ज्ञ यंत्रणांचा असेल, परंतु हा प्रश्न विचारण्याचा आणि त्यावर सार्वजनिक चर्चा होण्याचा अधिकार लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला आहे. लोकशाहीची खरी ताकद ही समानतेच्या भावनेत असते. राज्याने सर्व विचारप्रवाहांकडे, सर्व ऐतिहासिक प्रतीकांकडे आणि सर्व सामाजिक समूहांकडे समान संवेदनशीलतेने पाहिले, तरच नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होतो. अन्यथा सुरक्षा व्यवस्थेतील विषमता ही केवळ प्रशासकीय बाब राहत नाही तर ती सामाजिक संदेश बनते आणि लोकशाहीत संदेशही तितकेच महत्त्वाचे असतात जितके निर्णय.



आज प्रश्न केवळ दीक्षाभूमीच्या अध्यक्षांना झेड प्लस सुरक्षा द्यावी की नाही एवढाच नाही, तर भारतीय राज्यव्यवस्था कोणत्या प्रतीकांना राष्ट्रीय महत्त्व देते आणि कोणत्या प्रतीकांकडे दुर्लक्ष करते, हाही आहे. संघभूमीच्या नेतृत्वाच्या सुरक्षेबाबत शासन अत्यंत संवेदनशील असू शकते, तर संविधान, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे जागतिक प्रतीक असलेल्या दीक्षाभूमीबाबत तीच संवेदनशीलता का दिसत नाही, हा मूलभूत प्रश्न आहे. हा केवळ एखाद्या व्यक्तीच्या सुरक्षेचा मुद्दा नसून देशातील दोन प्रभावशाली वैचारिक प्रवाहांना मिळणाऱ्या समान वागणुकीचा आणि सन्मानाचा प्रश्न आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक आहे. अन्यथा लाखो आंबेडकरी अनुयायांच्या मनात एकच प्रश्न अधिक तीव्रतेने घुमत राहील, संघभूमीच्या संघप्रमुखाला झेड प्लस सुरक्षा मिळू शकते, तर संविधानभूमीच्या प्रतिनिधींना समान सन्मान आणि सुरक्षा का मिळू नये? शताब्दीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या संघभूमीइतकीच सत्तर वर्षांहून अधिक काळ सामाजिक परिवर्तनाची मशाल पेटवून ठेवणाऱ्या दीक्षाभूमीची दखल घेण्याचे धैर्य शासन दाखवणार का, की समानतेच्या घोषणा केवळ भाषणांतच राहणार? याचे उत्तर आता सरकारलाच द्यावे लागेल.

**प्रवीण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# टाकळी- कदमवाडी शिवारात एका २५ वर्षीय तरुणाचा चाकुने भोसकून खून!

## केज बिड राष्ट्रीय महामार्गावरील थरार...
## केज तालुक्यातील घडलेल्या या घटनेने मात्र शहरात तणावपूर्ण शांतता

**केज/प्रतिनिधी :** केज बीड रोडवरील रेणु बारसमोर पूर्ववैमनस्यातून एका २५ वर्षीय तरुणाची चाकूने पोटात वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी केज पोलिसांनी कोर्टात सादर केलेल्या अधिकृत पोलीस रिपोर्टनुसार (गु.र.नं. ३९२/२०२६) तात्काळ कारवाई करत दोन मुख्य आरोपींना अटक केली असून, इतर ७ आरोपी मात्र सध्या फरार आहेत. विलास नवनाथ घुले (वय २५, रा. टाकळी, ता. केज) असे या घटनेत मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचा भाऊ रमेश नवनाथ घुले (वय ३५) याने केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

घटनाक्रम आणि हत्येचे कारण पोलीस रिपोर्टमधील माहितीनुसार, मृत विलास घुले आणि त्याचा भागीदार आकाश चाळक हे टाकळी फाटा ते कदमवाडी फाटा दरम्यान 'हॉटेल गावकरी' चालवत होते. दि.२० जून २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास आकाश चाळक, उमेश माने आणि स्वयंपाकी गणेश शुक्ला हे हॉटेलवर बसलेले असताना, आरोपी पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून (क्र. MH-44 Z-9542) तिथे आले.

तू माझ्या बायकोचा नाद का सोडत नाहीस, आज तुझा मर्डरच करतो असे म्हणत आरोपींनी उमेश माने यास जीवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण सुरू केली. जीव वाचवण्यासाठी उमेश माने केजच्या दिशेने पळाला असता, त्याच्या मागे विलास घुले आणि त्याचा चुलत भाऊ नितीन घुले हे देखील धावले.

केज-बीड रोडवरील रेणु बार आणि बंद असलेल्या समर्थ बिअरबार समोर राष्ट्रीय महामार्गावर आरोपींनी त्यांना गाठले. तू मध्ये का पडतोस? असे म्हणत आरोपी रामेश्र्वर गायकवाड याने विलासच्या पोटात चाकू खुपसला. या गंभीर हल्ल्यात विलास घुले गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचार सुरू असताना दिनांक २१ जून रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

२ आरोपी गजाआड ७ जण फरार या घटनेनंतर केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ शोध मोहीम राबवून दिनांक २२जून २०२६ रोजी पहाटे दोन आरोपींना अटक केली. १) बाबासाहेब गोरोबा उर्फ गोरख कदम वय (४० वर्षे राहणार कदमवाडी)- अटक वेळ दि.२२/६/२०२६ रोजी पहाटे ०२.१५ वाजता. २) संतोष नरहरी कदम (वय ४५वर्षे रा. कदमवाडी)- अटक वेळ दि.२२/६/२०२६ रोजी पहाटे ०३.१२ वाजता. पोलीस रिपोर्टनुसार, सदर गुन्ह्यात ८९ आरोपीवर भारतीय न्याय समितीच्या (BNS) कलम १०३(१)(खून),१०९,१८९(२),१९१(२),१९१(३),१९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगेश गोरख कदम, भैय्यासाहेब गायकवाड, अजय उर्फ बंकटी कदम, नवनाथ कदम आणि दीपक कदम हे सात आरोपी सध्या फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

७ दिवसांची पोलीस कोठडी; पोलिसांचा तपास रिपोर्ट सादर. पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी साहेब कोर्ट केज यांच्या सेवेत सादर केलेल्या पोलीस





कस्टडी रिमांड (झउठ) रिपोर्ट मध्ये ७ दिवसाची पोलीस कोठडी मागण्यासाठी खालील प्रमुख कारणे नमूद केलेली आहेत. अटक केलेल्या आरोपींव्यतीरिक्त इतर ७ फरार आरोपींच्या ठावठिकाणाबाबत माहिती मिळवून त्यांना अटक करणे बाकी आहे. गुन्ह्यात मेहतास मारण्यासाठी वापरलेले मुख्य हत्यार (चाकू) जप्त करणे आहे. गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ गाडी क्रमांक (MH-44 Z-9542) जप्त करणे बाकी आहे.आरोपींनी अत्यंत क्रूरपणे चाकू खूप छान हत्या केली असल्याने या गंभीर घटनेचा आरोपींकडे घटनाक्रममानुसार बारकाईने अधिक तपास करणे आवशयक आहे. सदरचा गुन्हा आरोपींनी नक्की कोणत्या मुख्य कारणासाठी केला आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे का?, याचा शोध घेणे बाकी आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे हे स्वतः करत आहेत.

### बीड जिल्ह्यातील शाळा आता सकाळच्या सत्रात भरणार; वाढत्या तापमानामुळे जिल्हा परिषदेचा मोठा निर्णय

**बीड/प्रतिनिधी:** राज्यात सध्या वाढलेल्या तापमानाचा आणि उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन बीड जिल्हा परिषदेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मंगळवार, दि. २३ जून २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात येणार आहेत. याबाबतचे अधिकृत परिपत्रक जिल्हा परिषद प्रशासनाने सोमवारी जारी केले. 'अल निनो'च्या प्रभावामुळे तसेच पावसाच्या लांबलेल्या प्रतीक्षेमुळे जिल्ह्यात तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिक्षण विभागाने हा निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली आहे. नवीन आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा सकाळी ८.०० ते दुपारी १२.३० या वेळेत चालविण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य

तीव्र उष्णतेमुळे विद्यार्थ्यांना उष्माघात, निर्जलीकरण तसेच उष्णतेशी संबंधित इतर आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. या संभाव्य धोक्याचा विचार करून विविध शिक्षक संघटनांच्या मागण्या आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राचा संदर्भ घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

तातडीने अंमलबजावणीचे आदेश

जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना या बदलाची तात्काळ माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे पालक व शिक्षकांकडून स्वागत केले जात आहे.

----------

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी दि. १७ जून २०२६ रोजी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव मा. चंद्रकांत पुलकुंडकर (भा. प्र. से.) यांना पत्र देऊन मराठवाड्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्र्वभूमीवर शाळा तापमान कमी होईपर्यंत सकाळच्या पाळीत भरविण्याबाबत सूचना देण्याची मागणी केली होती.

### सर्वोच्च न्यायालयात २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान विशेष लोकअदालत

**लातूर/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणामार्फत समाधान समारोह या उपक्रमांतर्गत २१ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयात विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष लोकअदालतीमध्ये लातूर जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली सर्व प्रकारची प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी व दिवाणी प्रकरणे ठेवण्यात आली असून, यामध्ये प्रामुख्याने बँकिंग, दिवाणी, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई, ग्राहक तक्रार निवारण, परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणे, कौटुंबिक वाद, कामगार व औद्योगिक वाद, भूसंपादन आणि सेवेशी संबंधित प्रकरणांचा समावेश आहे.

या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरणात यशस्वी तडजोड व्हावी, या हेतूने नोटिसा बजावण्यात आल्या असून, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूरचे सचिव व्यंकटेश गिरवलकर व प्रशिक्षित मध्यस्थ वकील यासाठी निरंतर प्रयत्न करत आहेत. तरी लातूर जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालयात दाखल प्रकरणांमधील संबंधित पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने मिटवून प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीस संजय भारुका, सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

### लातूर जिल्हा क्रीडा संकुलात २३ जून रोजी 'जागतिक ऑलिम्पिक डे' चे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च महोत्सव असलेल्या ऑलिम्पिकच्या स्थापना दिनानिमित्त येत्या २३ जून २०२६ रोजी लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलातील लॉन टेनिस मैदानावर सायंकाळी ४ वाजता 'जागतिक ऑलिम्पिक डे' उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. २३ जून १८९४ रोजी ग्रीस येथे पियरे डी कौबर्टिन यांनी ऑलिम्पिकची स्थापना केली होती आणि याच ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती'सह जगातील २०० हून अधिक ऑलिम्पिक संघ हा दिवस 'ऑलिम्पिक डे' म्हणून साजरा करतात.

या सोहळ्यात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात येणार असून, त्यासोबतच क्रीडा क्षेत्रातील घडामोडी व मार्गदर्शनासाठी विशेष चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिसंवादाचे (सेमिनार) आयोजन केले गेले आहे. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक आणि क्रीडाप्रेमी सामान्य नागरिकांनी २३ जून रोजी सायंकाळी ४ वाजता जिल्हा क्रीडा संकुलात उपस्थित राहून या क्रीडा महोत्सवात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## स्मशानभूमीस विंधन विहीर देत अक्का फाऊंडेशनने मृत्तात्म्याच्या स्मरणार्थ वाहिली अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली

**लातूर/प्रतिनिधी :** औराद शहाजनी येथील मारवाडी स्मशान भूमीत काल अक्का फाऊंडेशन निलंगा व आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या संयुक्त विद्यमाने एक विंधन विहीर घेऊन हनुमानदास लड्डा यांना अनोख्या पद्धतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या स्मशानभूमीत घेण्यात आलेल्या विंधन विहिरीस ३०० फुटावरती ३ इंच पाणी लागले असून तिथे वृक्षारोपण करण्याचा माहेश्वरी समाजाच्या वतीने संकल्प करण्यात आला आहे.

या विधायक कार्यास मधुसूदन बियाणी, पंकज बियाणी, विनोद सोनी, गणेश चांडक, श्रीकांत चांडक, प्रदीप सोनी, भगवानदास लड्डा, आदर्श व्यास, माहेश्वरी समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंदू लड्डा, अजय झंवर, भरत बियाणी, राम बियाणी, घनश्याम मालपाणी, जुगल मंत्री, जुगल बियाणी, संजय बियाणी, अरविंद खंडेलवाल, अमर बियाणी, पुरुषोत्तम झंवर, पवन मालपाणी, लक्ष्मीकांत राठी, अश्विन खंडेलवाल व अक्का फाउंडेशन निलंगा व भाजपा परिवार औराद शहाजनी तर्फे शिवकुमार मंडगे, भगवानदास लड्डा, औराद मंडळ अध्यक्ष अनिल भंडारे, सरचिटणीस चंद्रशेखर शंकद, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष कन्हैया पाटील, राजाराम कहार, इर्शाद पटेल, प्रताप कांबळे, अमोल सूर्यवंशी, नरेश हिरेमठ, सिराज नाईकवाडे, मुश्ताक नाईकवाडे, बाबुस शिंदे, शरद भंडारे या सर्वांचे मोलाचे सहकार्य व योगदान लाभले.

## जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा



**केज/प्रतिनिधी :** केज येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि बंसल क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन शिक्षण संकुलाच्या प्रांगणामध्ये योग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थापक सचिव तथा जनविकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.हारुणभाई इनामदार नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की योगाचे फायदे काय आहेत. ते म्हणजे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुधारते, तणाव कमी होतो. व शांतता मिळते, एक आग्रता व आत्मविश्वास वाढतो, जीवनशैली निरोगी बनते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते यासह अनेक फायदे होत आहेत.

म्हणून सर्वांनी योगासने करण्याची गरज आहे असे मोलाचे मार्गदर्शन करून योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. विभागीयस्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त कर्ते योगभ्यासक, योग प्रशिक्षक मार्गदर्शक म्हणून विजय अच्युतराव आंधळे सर यांनी उपस्थितीत सहभागींना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थापक सचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे, लोंढे सर, सय्यद सर, दिशांत जाधव, धम्मानंद गायकवाड, प्रशांत गायकवाड यांच्यासह शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि योग प्रेमी, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

## 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त त्र्यंबकेश्वर येथे साकार होणार भक्ती, संस्कृती आणि परंपरेचा अद्वितीय संगम

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता त्र्यंबकेश्वर मंदिर, नाशिक.येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, अध्यात्म आणि सनातन परंपरेचे महत्त्व जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हा भारतीय सांस्कृतिक अस्मिता, अखंड श्रद्धा आणि अध्यात्मिक परंपरेचा गौरव करणारा उपक्रम आहे. या पर्वाच्या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीतील विविध भावविश्व, भक्तीपरंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचे कलात्मक सादरीकरण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात चित्रपट अभिनेत्री संस्कृती बालगुडे व कलाकार समूह यांचे विशेष अध्यात्मिक सादरीकरण होणार असून, त्यांच्या अभिव्यक्तीतून भक्ती, संस्कृती आणि भारतीय परंपरेचे विविध पैलू रसिकांना अनुभवता येणार आहेत. त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पवित्र परिसरात होणारा हा सांस्कृतिक कार्यक्रम अध्यात्म आणि कलेचा सुंदर संगम ठरणार आहे. या माध्यमातून उपस्थितांना सांस्कृतिक वारशाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून; तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे, अभिजात कला, लोककला आणि थोर कलावंतांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमास सर्व नागरिकांसाठी विनामूल्य प्रवेश आहे. कला रसिक, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत सादर झाला शोकप्रस्ताव

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून म्हणजेच सोमवार २२ जूनपासून सुरुवात झाली असून १० जुलैपर्यंत ते चालणार आहे. ऑपरेशन टायगरच्या पार्श्र्वभूमीवर होर्णाया या अधिवेशनात पावसाने मारलेल्या दडीमुळे निर्माण झालेल्या दुष्काळाचे सावट असेल.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत शोकप्रस्ताव सादर करण्यात आला. या शोकप्रस्तावात पद्मविभूषण आशा भोसले; पद्मभूषण सुमन कल्याणपूर; म ाजी मंत्री अनंतराव थोपटे, माजी आमदार विठ्ठलराव लक्ष्मणराव धोटे, बळीराम कडुजी कोटकर-पाटील, कृष्णराव नानासाहेब देशमुख, पटल्या लंगडा मावसकर, वसंतराव दोधा सुर्यवंशी, सुरेशकुमार कन्हैयालाल जेथलिया, उषादेवी कृष्णराव जगदाळे आज शकुंतला नंदकिशोर शर्मा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# आपल्या स्वतंत्र अस्तित्वासाठी मूळ भारतीयांचे ऐक्य आवश्यक : बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७६ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने संत कबीर जयंतीनिमित्त आयोजित आदरांजली सभेत जो दुसऱ्यावरी विश्र्वासला त्याचा कार्यभाग बुडाला या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक विचारावर आधारित १७६ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात संपन्न झाली.

अध्यक्षीय समारोप करताना फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, व्यक्तिगत स्वार्थापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी मानसिकता विकसित करणे ही काळाची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशानुसार स्वतःच्या उन्नतीसाठी स्वतःच पुढाकार घेणे आवश्यक असून, आपल्या स्वतंत्र सामाजिक अस्तित्वासाठी मूळ भारतीय समाजाचे व्यापक ऐक्य निर्माण झाले पाहिजे.

शिक्षण, संघटन आणि कृतीच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणता येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना विनामूल्य उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन करणाऱ्या नालंदा अकादमीच्या कार्याचा उल्लेख करत अशा उपक्रमांची समाजात गरज असल्याचे सांगितले. तसेच १९ जून १९३८ रोजी चाळीसगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या भाषणाचा संदर्भ देत, जो दुसऱ्यावर विश्र्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला या विचाराचा स्वीकार करून स्वबळावर प्रगती साधण्याचे आवाहन केले.

आगामी २६ जून रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त गांधी भवन, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित मूलभारती एकता परिषद यशस्वी करण्यासाठी त्यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

उद्घाटनपर भाषणात सामाजिक कार्यकर्ते प्रमोद माटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करून सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करण्याची गरज व्यक्त केली.

प्रमुख वक्ते डॉ. ड. अशोक उके यांनी अनुभव हेच सर्वश्रेष्ठ शिक्षण असल्याचे सांगत, सक्षम नेतृत्वाच्या अभावामुळे समाजाची झालेली हानी अधोरेखित केली. श्रम, वेळ आणि आर्थिक साधनांचा विधायक वापर केल्यास समाज सक्षम होईल, असे ते म्हणाले.

यावेळी उद्योजक शशिकांत काळे, डॉ. कल्पना गंगावणे आणि उद्योजक मिलिंद बागुल यांनीही मनोगत व्यक्त करून शिक्षण, विवेक, सामाजिक जबाबदारी आणि संघटन यांचे महत्त्व स्पष्ट केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन ड. विलास रामटेके यांनी तर आभार मिलिंद बागुल यांनी मानले.

# संविधानाच्या रक्षणासाठी व काँग्रेसला सत्तेत आणण्यासाठी ५९ जातींनी एकत्र यावे- डॉक्टर अनिरुद्ध वनकर

## लातुरात अनुसूचित जाती विभागाची महत्त्वपूर्ण बैठक व सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग यांची संयुक्त व महत्त्वपूर्ण बैठक आज, रविवारी (२१ जून) काँग्रेस भवन, लातूर येथे अत्यंत उत्साहात व नवचैतन्याच्या वातावरणात पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे नवनियुक्त अध्यक्ष मा. डॉ. अनिरुद्ध वनकर, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर आणि लातूरच्या नवनिर्वाचित महापौर सौ. जयश्री सोनकांबळे यांचा भव्य सत्कार करण्यात आला.






संविधान हाच आपला प्राणवायू - डॉ. अनिरुद्ध वनकर यावेळी सत्काराला उत्तर देताना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि आक्रमक विचार मांडले. ते म्हणाले, गेल्या ३५ दिवसांपासून माझा राज्यभरात दौरा सुरू असून लातूरमध्ये आ. अमितभैय्या देशमुख यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस कमिटीने केलेले स्वागत अत्यंत आनंददायी आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सध्याची लढाई ही मनुस्मृतीच्या प्रवृत्तीशी असून संविधानाच्या रक्षणासाठी आहे. सर्वसामान्य माणूस, महिला आणि शोषित वर्गाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार फक्त संविधानाने दिला आहे. त्यामुळे संविधान हा आपला प्राणवायू आहे.

या देशात राहुल गांधी हे संविधानाच्या रक्षणासाठी एकाकी झुंज देत आहेत. त्यांना साथ देण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ जातींनी आणि अठरापगड जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येण्याची गरज आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणून काँग्रेसचा मुख्यमंत्री बसवणे आणि देशात राहुल गांधी यांना पंतप्रधान करणे, हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

लातूर जिल्ह्यात मजबूत जाळे निर्माण करण्याचा संकल्प डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या रूपाने एका खऱ्या आंबेडकरवादी आणि लढाऊ योद्ध्याला प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्याची भावना जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी व्यक्त केली.

राज्याचे माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर आणि जिल्ह्यात गाव आणि वॉर्ड पातळीवर अनुसूचित जाती विभागाच्या शाखा स्थापन करून काँग्रेस पक्षाचे मजबूत जाळे निर्माण करण्याचा संकल्प यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी केला.

विशेष म्हणजे, स्वतः अनुसूचित जाती प्रवर्गातील असलेल्या प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांची लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने समाजाला पक्षात एक अत्यंत महत्त्वाचे व सन्मानाचे स्थान मिळाल्याची कृतज्ञता यावेळी व्यक्त करण्यात आली.

या बैठक आणि सत्कार समारंभात लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, प्रदेश सचिव डॉ. दिनेश नवगीरे, शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर व लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब गायकवाड यांनीही बैठकीला संबोधित केले व अनुसूचित जाती विभागाचे नूतन प्रांताध्यक्ष वनकर यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक अनुसूचित जाती विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे यांनी केले तर सूत्रसंचलन नारायण कांबळे यांनी पार पाडले.

या कार्यक्रमांमध्ये महानगरपालिकेतील सदस्य, जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य व विविध संस्थेवर काम करणारे संचालक नगरपालिकेतील नगरसेवक विकास सतिश कांबळे, मुकेश गायकवाड, माणिक गायकवाड, महादेव मस्के, बालाजी अंधारे, तात्याराव वाघमारे, नामदेव उपहाडे, नितीन जाधव, अमोल देडे, परमेश्र्वर शिंदे, शिवाजी कांबळे, वी. बालाजी वाघमारे, अनिल दरकसे, दीपक बनसोडे , तानाजी कांबळे, संग्राम नामवाड यांचा सत्कार करण्यात आला. या महत्त्वपूर्ण बैठकीच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.अभयदादा साळुंके तसेच माजी उपमहापौर कैलास कांबळे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष प्रविण सूर्यवंशी, मनपा सदस्य असिफ बागवान, माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव मस्के, माजी समाज कल्याण सभापती मधुकर एकुगेकर साहेब, मागासवर्गीय विभागाचे प्रदेश पदाधिकारी संजय ओव्हाळ इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास विलासराव देशमुख युवा मंचचे अध्यक्ष विजय टक्केकर, पवनकुमार गायकवाड, किरण बनसोडे, आकाश मगर, अशोक सूर्यवंशी, बब्रूवान गायकवाड, भाऊसाहेब भडीकर , राजाबाऊ गायकवाड, संदीपान सूर्यवंशी, अड.अंगद गायकवाड, अंगद वाघमारे, नरसिंग कांबळे, सोमेन वाघमारे, हरीश वाघमारे, प्रमोद उबाळे, संगीता कांबळे, सुधाताई कांबळे, शीतल मोरे, संतोषी सोनवणे, नागनाथ डोंगरे, एड.विजय गायकवाड, पिराजी साठे, काशिनाथ वाघमारे, सिराज शेख, फारुख शेख श्यामराव सूर्यवंशी, आनंदभाई वैरागे, एड.देविदास बोरुळे पाटील, सुग्रीव साबळे, शिवाजी कांबळे, काशिनाथ जोंधले, मारुती कांबळे, गिरीश पात्रे, कल्याण शाहीर, राहुल मोरे, राहुल वाघमारे, रमेश सोनवणे, अजय चक्रे, संग्राम कांबळे, गौतम मुळे, इत्यादी उपस्थित होते.

याप्रसंगी अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडून आलेले काँग्रेसचे सर्व महानगरपालिका सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सहकार संस्थेतील संचालक आणि नगरपंचायत सदस्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु. जाती विभाग अध्यक्ष ड. बाबासाहेब गायकवाड आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु. जाती विभाग अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष, प्रभाग अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीमुळे लातूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# लातूर येथे समाज कल्याण वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त समाज कल्याण विभागाच्यावतीने रविवारी येथील मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोरील येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात योग दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित विशेष योग सत्रात समाज कल्याण वसतिगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. योगाचार्य नंदिनी पडीले यांच्या मार्गदर्शनाखाली हे योग सत्र पार पडले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवशेटवार हे होते. तसेच याप्रसंगी समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, सुवर्ण जगताप यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती पडीले म्हणाल्या, योग आणि व्यायामामुळे आपली स्मरणशक्ती, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक स्वास्थ्य वाढते. हीच आपल्या आयुष्यातील सगळ्यात मोठी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून आपली जीवनशैली बदलणे आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्यासाठी नियमित योग करणे अत्यंत जरुरी आहे.

या विशेष शिबिराला वर्षा चौधरी, मुक्ता किर्दल, सनराईज योगा स्टुडिओच्या महिला सदस्या यांच्यासह समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि वसतिगृहाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिकमधून गोकुळ गीते यांचा दणदणीत विजय

**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यभराचे लक्ष लागलेल्या नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत मोठा राजकीय उलटफेर पाहायला मिळाला आहे. अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारे गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उम ेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे पहिल्याच फेरीत आवश्यक विजयाचा कोटा पूर्ण करत गीते यांनी निवडणूक जवळपास एकतर्फी जिंकली.

मतमोजणीला सकाळी सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच फेरीत गोकुळ गीते यांनी मोठी आघाडी घेतल्याचे स्पष्ट झाले. उपलब्ध माहितीनुसार, त्यांनी विजयासाठी आवश्यक मतसंख्या सहज गाठली असून त्यांना तब्बल ३८९ मते मिळाल्याचा दावा समर्थकांकडून करण्यात येत आहे.

निकालाचे चित्र स्पष्ट होताच मतमोजणी केंद्राबाहेर गीते समर्थकांनी जल्लोष सुरू केला. मतमोजणी सुरू होण्यापूर्वी केंद्रावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गोकुळ गीते यांनी नाशिक शिक्षक म तदारसंघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांच्या मतमोजणी कक्षातील उपस्थितीवर आक्षेप घेतला. निवडणूक आयोगाच्या नियम ांनुसार विद्यमान लोकप्रतिनिधींना प्रतिनिधी म्हणून मतमोजणी कक्षात बसण्यास मनाई असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

यामुळे दोन्ही गटांचे समर्थक आमनेसाम ने आले आणि काही काळ वादावादी झाली. त्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित बाबींची सुनावणी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिस बंदोबस्तात मतमोजणीची प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्यात आली.

छुप्या मतदानाची चर्चा ठरली खरी?

निवडणुकीपूर्वी महायुतीच्या नेत्यांकडून क्रॉस व्होटिंग आणि छुप्या मतदानाबाबत व्यक्त करण्यात आलेल्या शंका निकालानंतर अधिक बळकट झाल्याचे मानले जात आहे. नाशिक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ महायुतीच्या बाजूने असतानाही गोकुळ गीते यांना मिळालेला मोठा पाठिंबा अनेक प्रश्न निर्माण करणारा ठरला आहे. राजकीय विषकांच्या मते, महायुतीच्या मतांमध्ये झालेली फूट आणि स्थानिक पातळीवरील नाराजी यांचा फायदा गोकुळ गीते यांना झाला.

# अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयू यांच्याकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लॉंच

## ४ वर्षांचा रेसिडेन्शियल (निवासी) प्रोग्राममध्ये यूजीसी-मान्यताप्राप्त पदवीसह इंडस्ट्री-इंटिग्रेटेड एआय इंजिनिअरिंग शिक्षणाचे संयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लॉंच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.

या सहयोगांतर्गत, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी कॅम्पस पायाभूत सुविधा, निवासी शिक्षण वातावरण प्रदान करेल आणि यूजीसी-मान्यताप्राप्त बी.टेक पदवी बहाल करेल. यूजीएसओटी एडीवायपीयूसोबत सहयोगाने इंडस्ट्री-इंटिग्रेटेड (उद्योगाभिमुख) शिक्षण अनुभव देण्यास मदत करेल. यामध्ये जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांकडून लाईव्ह मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सेमिस्टरपासून प्रत्यक्ष कोडिंग व प्रॉडक्ट-बिल्डिंग स्प्रिंट्स, आणि उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ व आघाडीच्या प्रमुखांसोबत नियमित संवाद यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

या प्रोग्राममधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या करिअर सपोर्ट परिसंस्थेचा फायदा मिळेल, ज्यामध्ये ३००० पेक्षा जास्त हायरिंग पार्टनर्स आहेत. तसेच या प्लेसमेंट नेटवर्कने आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान १,१०,००० हून अधिक प्लेसमेंट्स मिळवून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा रोजगार आणि करिअरच्या वाढीचा मार्ग अधिक प्रबळ झाला आहे.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन आणि अजिंक्य डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील म्हणाले, अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपमध्ये आमचा नेहमी विश्वास राहिला आहे की, शिक्षण हे भविष्यानुसार बदलले पाहिजे. हा सहयोग शैक्षणिक विश्वासार्हता आणि उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता यांना एकाच व्यासपीठावर आणतो, ज्यामुळे विद्यार्थी मान्यताप्राप्त पदवी मिळवण्यासह वेगाने बदलणाऱ्या जगात प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करतील.

अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्वा मोहन म्हणाले, ‘‘भारतात इंजिनिअरिंगच्या गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती, कमतरता होती ती उद्योग क्षेत्राला प्रत्यक्षात काय पाहिजे याच्याशी सुसंगत असणाऱ्या इंजिनिअरिंग शिक्षणाची. ही तफावत दूर करण्यासाठी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटीसोबत हा सहयोग करण्यात आला आहे: एक खरी पदवी, एक खरा कॅम्पस आणि खरी कौशल्ये ज्यांच्या जोरावर कंपन्या पहिल्या दिवसापासून नोकरी देतात. आम्ही ज्या युनिव्हर्सिटींसोबत काम करत आहोत, तिथे हेच मॉडेल आणत आहोत.

भारतात दरवर्षी जवळपास १.५ दशलक्ष इंजिनिअरिंग पदवीधर तयार होतात, तरीही रोजगाराची मोठी तफावत या क्षेत्रासमोर आव्हान म्हणून उभी आहे. इंजिनिअरिंग हा अजूनही देशातील सर्वात लोकप्रिय करिअर मार्गांपैकी एक असला तरी अनेक पदवीधरांकडे एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. भविष्यासाठी सज्ज असलेल्या मनुष्यबळाची मागणी झपाट्याने वाढत असताना अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी यांच्यामधील या सहयोगाचा अशा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-फर्स्ट इंजिनिअरिंग शिक्षण मॉडेलच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.



हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.